सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

▲ वर्ष १ ले ▲ अंक : ७३ ▲ रविवार, दि. ७ डिसेंबर २०२५ ▲ पाने : ४ ▲ अमळनेर ▲ किंमत : १ रु. Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

०७ डिसेंबर

- पहिले वाफेवर चालणारे जहाज एंटरप्राइझ भारतात आले.
- पहिला उच्चवर्णीय विधवा विवाह कोलकाता येथे झाला.
- अस्पृश्यतेच्या कारणावरचा प्रभातचा धर्मात्मा हा चित्रपट मुंबईतील कृष्णा सिनेमात प्रदर्शित झाला.
- अपोलो १७, शेवटची अपोलो मून मोहीम प्रक्षेपित झाली. क्रू पृथ्वी सोडताना द ब्लू मार्बल म्हणून ओळखले जाणारे छायाचित्र घेतात
- आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक दिवस, आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटनेच्या (ICAO) स्थापनेच्या ५० व्या वर्धापनदिनानिमित्त सुरू करण्यात आला.

# विद्यार्थिनींच्या छेडखानीविरुद्ध निघाला अमळनेरचा पहिला महाआंदोलन- मोर्चा




छायाचित्र : अजय निंबा पाटील (आणखी छायाचित्रे पान ३ वर)

## दै. ग्लोबल महातेजने पुकारलेल्या एल्गारला विद्यार्थिनींसह विविध संघटनांचा पाठिंबा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा


**अमळनेर– येथे विद्यार्थिनींची रोज होणारी छेडखानी, गुंडांचा हैदोस यामुळे काही अघटीत व अप्रिय घटना होऊ नये यासाठी वेळीच कायमस्वरूपी, ठोस, कठोर प्रतिबंधकात्मक कारवाई व्हावी, यासाठी शनिवार, दि. ६ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता धुळे रोडवरील साने गुरुजी विद्यालयाच्या प्रांगणातून महाआंदोलन– मोर्चा निघून तो प्रांताधिकारी कार्यालयावर पोचला. तेथे तहसीलदार रुपेशकुमार सुराणा व पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी मोर्चेकऱ्यांचे निवेदन स्वीकारले.**

दरम्यान, विद्यार्थिनींच्या छेडखानीविरूद्ध अशा प्रकारे निघालेला हा शहरातील पहिलाच मोर्चा होय. दै. ग्लोबल महातेज विविध ज्वलंत समस्यांना सडेतोडपणे सातत्याने वाचा फोडतो आहे. समस्यादर्शक फक्त बातम्याच प्रसिद्ध न करता त्यासंदर्भात उच्चपदस्थांपर्यंत तक्रारी करून समस्या निराकरणासाठी प्रयत्नही करतो आहे. गेल्या कित्येक दिवसांपासून विद्यार्थिनींच्या होत असलेल्या छेडखानीबाबत अनेक विद्यार्थिनी व पालकांनी दै. ग्लोबल महातेजकडे अतिशय गंभीर तक्रारी केल्या होत्या. त्यामुळे दै. ग्लोबल महातेजने या विरोधात मोठे जनआंदोलन उभारण्यासाठी सर्व शैक्षणिक संस्था, समाजसेवी संस्था, विविध पक्ष आदींना सहभागी होण्यासाठी विनंती केली होती. त्यापैकी अनेकांनी ग्लोबल महातेजला मोठा सकारात्मक प्रतिसाद दिल्याने शनिवार, दि. ६ डिसेंबर रोजी भव्य जनआंदोलन मोर्चा निघाला.

मोर्चाचा प्रारंभ साने गुरुजी शाळेतून झाला. शाळेत उपस्थित विविध शाळा व महाविद्यालयांमधील शेकडो विद्यार्थिनींना श्रीमती स्नेहा एकतारे, संदीप घोरपडे, मुख्याध्यापिका श्रीमती अनिता बोरसे, डॉ. डिगंबर महाले यांनी उत्साहीत करणारे, मनोबल वाढविणारे व प्रबोधनपर मनोगते व्यक्त केली.

पान ३ वर

### ही बाब अत्यंत असहनिय




आपल्या मतदारसंघातील विद्यार्थिनी म्हणजेच माझ्या मुली जर असुरक्षित असतील, त्यांना काही गुंड व समाजकंटक त्रास देत असतील, तर ही बाब अत्यंत असहनिय व निंदनीय आहे. याबाबत मी पोलीस व प्रशासनाला माझ्या तीव्र भावना तोंडी व लेखी स्वरूपात तत्काळ कळवतो. टवाळखोर मुलांच्या पालकांनी त्यांना सुधरावावे अन्यथा त्यांच्यावर अत्यंत कडक कारवाई होईलच. त्यामुळे त्यांचे भविष्यही खराब होऊ शकते. पालकांनी आपली जबाबदारी टाळू नये.

– **अनिलदादा पाटील,** आमदार, अमळनेर.




शहरातील सर्व महाशक्ती येथे जमल्या आहेत. नावातून नव्हे तर कृतीतून आपल्या महाशक्तीचे अस्तित्व दाखवले पाहिजे. कायदा हातात न घेता महाशक्तीने उत्तर द्यायला शिकले पाहिजे. ज्या ठिकाणी तुम्हाला अडचण येईल, त्या ठिकाणी प्रशासन तुमच्या समस्या सोडविण्यासाठी कटीबद्ध आहे. काही अडचण असल्यास आपण माझ्याशी संपर्क साधावा. मी२४ तास आपल्या सेवेसाठी तत्पर आहे. माझा मोबाईल क्र. 9763353243 आहे.

– **रुपेशकुमार सुराणा,** तहसीलदार, अमळनेर.



मुलींची छेडखानी करणाऱ्या गुंडांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून नेहमीच प्रयत्न सुरू असतात. गावगुंडांना प्रतिबंध करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. जमलेल्या सर्व मुली या माझ्या मुली समान आहेत. माझ्या मुलीचा जो आदर राखला जाईल, तोच तुमचाही राखला जाईल. छेडखानी करणारा कोणत्याही मोठ्या कुटुंबातला कसाही गुंड असला तरीसुद्धा त्याचा निपटारा करण्यात येईल. पोलीस विभागातर्फे मी ती जबाबदारी स्वीकारतो. सर्व पोलीसकाका, पोलीसदीदी आपल्या सुरक्षेसाठी कार्यरत आहेत.

– **दत्तात्रय निकम,** पोलीस निरीक्षक, (8888205777)



आपले शहर आपण भयमुक्त करणार आहोत. गुंडांच्या होणाऱ्या त्रासापासून आपल्या मुक्ती मिळवायची आहे. धैर्याने आपल्याला पुढे जायचे आहे. मुलींच्या संरक्षणासाठी आपण सर्व जण येथे जमलेलो आहोत. मुलींच्या संरक्षणासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. मुलींचे शिक्षण कोठे थांबणार नाही, यांची आम्ही काळजी घेऊ. आपले शहर आदर्श रहावे ही शहरातील सर्वांचीच सामुहिक जबाबदारी आहे. यासाठी आम्ही येथे जमलेलो सर्वजण प्रयत्नशील आहोतच.

– **डॉ. अविनाश जोशी,** अध्यक्ष, मराठी वाङमय मंडळ.



हम भारत की नारी है, फुल नही चिंगारी है' हे आपल्या कृतीतून दिसले पाहिजे. जो आपल्याला अस्वस्थ करतो त्याला स्वस्थ बसू द्यायचे नाही. तुम्ही एकटे नाहीत. विविध संघटनांचे पदाधिकारी सोबत आहेत. संपूर्ण प्रशासन तुमच्या बाजूने आहे. त्यामुळे निर्भयपणे सांगण्यासाठी पुढे यावे. जशास तसे त्याच ठिकाणी उत्तर देण्याची ताकद आपल्यामध्ये आहे. सगळे मिळून शहरात भयमुक्त वातावरण निर्माण करू

– **प्रा. अशोक पवार.**



ग्रामीण भागातून शाळा, क्लासेसमध्ये येणाऱ्या विद्यार्थिनी बसने ये– जा करतात. बसमध्येही मुलींच्या छेडखानीचे प्रकार होतात. त्यामुळे अनेक मुलींचे शिक्षण बंद पडते. मात्र, मुलींनी घाबरू नये. विद्यार्थिनींकडून जर काही चूक झाली तर आम्हाला सांगा. आपण शंभर टक्के काळजी घेऊ. आम्ही तुम्हाला विश्वास देतो, की तुमची माहिती गोपनिय ठेवू. आम्ही खबरदारी घेऊ व तुमच्या समस्यांचे निराकरण करू.

– **भारती पाटील,** अध्यक्षा, आधार बहुउद्देशीय संस्था.



विद्यार्थिनींची छेडखानी थांबायला हवी. मुलींकडून कुठलीच चूक व्हायला नको, मग सर्वच तुमच्या पाठीशी राहतील. सर्वांनी तुमच्या संरक्षणाची जबाबदारी घेतली आहे. मुलींनीही स्वतःच्या मनावर ताबा ठेवावा. अमळनेर शहर आपल्याला भयमुक्त करायचे आहे. भयमुक्त शहराचा पॅटर्न महाराष्ट्रभर राबविला जाईल. यासाठी जी काही मदत लागेल, त्यासाठी अमळनेर शिक्षण प्रसारण मंडळ सर्वतोपरी सहकार्य करेल.

– **अनिता बोरसे,** मुख्याध्यापिका, साने गुरुजी कन्या हायस्कूल.



मोटारसायकलने ट्रिपल सीट वाहने चालवून टवाळखोर मुले चालत्या महिला मुलींना रस्त्यावर कट मारून जातात. ज्येष्ठ वयोरुद्ध नागरिक यांच्यासाठी चौकात ठेवलेले जे बाक आहेत त्या ठिकाणी नेहमी टवाळखोर मुले बसलेली असतात. प्रथमतः हे बाक हटविले पाहिजे. नाशिक जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला आहे, तसे अमळनेर शहर कायद्याचे माहेरघर झाले पाहिजे.

**विनोद जाधव,** जाधव क्लासेस.

## रोटरी क्लबतर्फे उद्या १२ जिल्ह्यांमध्ये महारक्तदान शिबीर

### वर्ल्ड रेकॉर्ड नोंदविणार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर– रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० अंतर्गत येणारे नाशिक, जळगाव, नागपूर, अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशीम, बुलढाणा, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यातील क्लबतर्फे सोमवार, दि. ८ डिसेंबर रोजी एकाच दिवशी महारक्तदान शिबिर होणार आहे.

शासकीय रुग्णालयात रक्ताची प्रचंड कमतरता निर्माण झाली आहे. रुग्णसेवा गंभीरपणे बाधित होत आहे. थॅलेसेमिया रुग्णांच्या उपचारात खंड पडत आहे. काही शस्त्रक्रिया पुढे ढकलण्याची वेळ येत आहे. अशा गंभीर परिस्थितीत रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० ने समाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत या महारक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. या उपक्रमासाठी शासकीय तसेच खासगी रक्तपेढ्यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे. रोटरी सदस्य, महिला, युवक व सर्वसामान्य नागरिक उत्साहाने सहभागी होणार आहेत.

विद्यापीठांचा सहभाग

रोटरी क्लबच्या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत जळगाव, नागपूर, अमरावती व गडचिरोली विद्यापीठांनी सर्व महाविद्यालयांना लेखी सूचना देऊन विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना रक्तदानासाठी प्रोत्साहित केले आहे. विशेष म्हणजे या महारक्तदान शिबिराची नोंद वर्ल्ड रेकॉर्ड बुकमध्ये करण्यात येणार आहे. अमळनेर शहरात रोटरी क्लबतर्फे प्रताप महाविद्यालयातील सामान्य हॉलमध्ये व पीबीए इंग्लिश स्कूलच्या रोटरी हॉलमध्ये हे शिबिर होणार आहे. शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन रोटरी क्लबचे अध्यक्ष देवेंद्र कोठारी सचिव आशिष चौधरी, असिस्टंट गव्हर्नर पूनम कोचर, प्रतीक जैन, रोहित सिंघवी, अभिजीत भंडारकर, कीर्ती कोठारी, योगेश येवले, ऋषभ पारख, राजेश बेदमुथा आदींनी केले आहे.

# आशीर्वाद पॅनलला लाभला अनेक मान्यवरांचा भरभक्कम आशीर्वाद

## खा. शि. मंडळाची निवडणूक बिनविरोध होण्याची अनेकांनी केली इच्छा व्यक्त

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर– येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या त्रैवार्षिक निवडणुकीसाठी शनिवार, दि. ६ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता संतश्री सखाराम महाराजांच्या वाडी प्रांगणात आमदार अनिलदादा पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांच्या हस्ते प्रचार नारळ वाढवून आशीर्वाद पॅनलच्या प्रचारास प्रत्यक्ष प्रारंभ झाला. खा.शि. मंडळाच्या इतिहासात पदाधिकाऱ्यांची निवडणूक कधीही बिनविरोध झाली नाही. मात्र, आशीर्वाद पॅनलमध्ये असलेले दिग्गज व अनुभवी उमेदवार पाहाता तसेच प्रचार नारळ वाढविण्याप्रसंगी सर्वच क्षेत्रातील मान्यवरांची प्रचंड उपस्थिती पाहाता ही निवडणूक

पान ३ वर



# महातेजाय मार्गदर्शिका ठरणार देशातील उच्चांकी खपाचे मासिक

## श्री मंगळग्रह मंदिरात अभिषेक करणाऱ्यांना मिळणार वर्षभर मोफत

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर– येथील श्री मंगळग्रह मंदिरातील विविध धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणविषयक, कृषीविषयक, आरोग्यविषयक, अंधश्रद्धा निर्मूलनपर, आदर्श वैवाहिक व कुटुंब पद्धती संदर्भातील प्रबोधनपर, राष्ट्रप्रेम, परंपरागत भारतीय संस्कृती वर्धक विविध उपक्रमांना प्रसिद्धी देणारे, मंदिराला व संस्थेला भेटी देणाऱ्या विविध मान्यवरांच्या प्रतिक्रिया तसेच धर्म, अध्यात्म, आयुर्वेद, विज्ञान, माहिती व तंत्रज्ञानबाबत आतापर्यंतची अलिखित व कोठेही प्रसिद्ध न झालेली माहिती महातेजाय मार्गदर्शिकेत प्रसिद्ध होईल.




पान ३ वर



# ७० हजार भारतीयांना रशिया देणार रोजगार भारत अन् रशियात नक्की कोणता करार झाला ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन चार वर्षांनी भारत दौऱ्यावर आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवार, दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी नवी दिल्लीतील हैदराबाद हाऊसमध्ये त्यांचे स्वागत केले. २३ व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी भारतात आलेल्या पुतिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींबरोबर अनेक करारांवर स्वाक्षरी केली आहे. त्यामध्ये दोन्ही देशांमधील एका ' मोबिलिटी पॅक्ट 'चा समावेश आहे. या करारामुळे भारतीय व्यावसायिकांना रशियात काम करणे सोपे होणार आहे. भारताचे असेच करार इस्त्रायल, जपान, जर्मनी आणि काही आखाती राष्ट्रांशीही (गल्फ नेशन) झाले आहेत. पण हा करार नक्की काय? त्याचे महत्त्व काय?

**भारत-रशियात कोणता करार झाला?**

भारत-रशिया मोबिलिटी करार झाला. या करारावर व्लादिमीर पुतिन व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे एकमत झाले. त्यांनी या करारावर स्वाक्षरी केली. भारत आणि रशियामध्ये स्वाक्षरी झालेल्या सर्व करारांपैकी कामगार मोबिलिटीचा करार हा सर्वांत उत्साहवर्धक आहे. त्यामुळे भारतीय व्यावसायिकांना रशियातील विविध क्षेत्रांमध्ये काम करण्यासाठी नवीन मार्ग खुले होतील. त्यात बांधकाम, अभियांत्रिकी, वस्त्रोद्योग, उत्पादन व इलेक्ट्रॉनिक्स यांसारख्या व्हाईट कॉलर आणि ब्ल्यू कॉलर अशा दोन्ही प्रकारच्या नोकऱ्यांचा समावेश आहे. या नवीन कामगार मोबिलिटी करारानुसार अंदाजे ७० हजार भारतीयांना रशियामध्ये रोजगार मिळण्याची शक्यता आहे.



हा करार अशा वेळी होत आहे जेव्हा रशियात कामगारांची तीव्र टंचाई जाणवत आहे. त्याचे कारण म्हणजे तेथील जन्मदर २०० वर्षांतील सर्वांत कमी पातळीवर आहे. लोकसंख्या ०.०८ टक्क्यांनी कमी झाली आहे. २०२२ मध्ये युक्रेन युद्धासाठी तीन लाख राखीव सैनिकांना बोलावल्यानंतर देशातील हजारो तरुणांनी देश सोडला. त्याचवेळी पाश्चात्त्य निर्बंधांचा परिणाम होत असतानाही रशिया आपले औद्योगीक उत्पादन वाढवीत आहे. रशियाचे औद्योगीक केंद्रस्थान असलेल्या उरल प्रदेशात कामगारांची गरज असल्याची माहिती आहे. प्राप्त वृत्तानुसार रशियाला या दशकाच्या अखेरीस तब्बल ३१ लाख कामगार-कर्मचारी पदे भरायची आहेत. रशियाची सर्वांत मोठी बँक असलेल्या ' स्बरबँक ' चे पहिले उपमुख्य कार्यकारी अधिकारी अलेक्झांडर वेद्याखिन यांनी सांगितले, की बँक औद्योगिक आयात आणि भारतातून कामगार स्थलांतर वाढविण्यासाठी काम करीत आहे. रशियातील बेरोजगारी आणि २०३० पर्यंत अपेक्षित असलेल्या किमान ३० लाख कामगारांच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर वेद्याखिन यांनी भारतीय कामगारांची मागणी अधोरेखित केली. ते म्हणाले, की हे कुशल कामगार आहेत आणि हे आमच्या सहकार्याच्या क्षेत्रांपाकी एक आहे. आम्ही आमच्या कंपन्यांना भारतातून कामगार आणण्यासाठी मदत करीत आहोत. वेद्याखिन यांनी एका वृत्तसंस्थेला सांगितले, की रशियात विशेषतः सेंट पीटर्सबर्गमध्ये कामगार तैनात करण्यासाठी महाराष्ट्रासह भारतातील कौशल्य विकास केंद्रांचा वापर करण्याबाबत चर्चा सुरू आहे. निरीक्षकांच्या मते भारतातील लोकसंख्याशास्त्रीय वाढ त्यांच्या फायद्याची आहे. २०३० पर्यंत भारताची सुमारे ६८.९ टक्के लोकसंख्या कार्यक्षम वयोगटातील असेल. ही जगातील सर्वांत मोठी संख्या आहे. स्थलांतरितांमध्ये भारतीयांचे प्रमाण सध्या सुमारे सहा टक्के आहे. अनेक भारतीय ब्ल्यू कॉलर कामगार आखाती देशांना पसंती देत असले तरी रशिया हळूहळू आकर्षक ठिकाण ठरत आहे. सध्या रशियात सुमारे एक लाख भारतीय कामगार कार्यरत आहेत. २०२४ च्या अंतिम तिमाहीत सुमारे ९,४०० भारतीय नागरिक नोकरीच्या शोधात रशियात दाखल झाले. जी संख्या २०२३ च्या तुलनेत सुमारे २.५ पट जास्त आहे.

**हा करार इतका महत्त्वाचा का?**

भारत आणि रशियाने २०२३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज डॉलर (नऊ लाख कोटी) पर्यंत वाढविण्यावर सहमती दर्शविली आहे. सध्या दोन्ही देशांमधील व्यापार प्रामुख्याने ऊर्जापुरवठ्यावर अवलंबून आहे. या आर्थिक वर्षात भारताने रशियातून ६३.८ अब्ज डॉलर (५.७४ लाख कोटी) किमतीच्या वस्तू आयात केल्या तर निर्यात केवळ ४.८ अब्ज डॉलर (०.४३ लाख कोटी) इतकी होती. कामगार क्षेत्रातील सहकार्यामुळे या संबंधांना आणखी एक आयाम मिळू शकतो. भारतीय कामगारांचे संरक्षण होऊ शकते आणि व्यापार तूट कमी होण्यास मदत होऊ शकते. तसेच अमेरिका आणि कॅनडासारख्या पाश्चात्त्य देशांनी त्यांचे स्थलांतर नियम कडक केल्याच्या पार्श्वभूमीवर हा करार महत्त्वाचा आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे, की भारतीय कामगारांना आकर्षित करण्यासाठी रशियाला अधिक प्रयत्न करावे लागतील. या करारामध्ये नागरिकांना रशिया युक्रेन युद्धाकडे आकर्षित होण्यासाठी संरक्षित करणारी तरतूद समाविष्ट असू शकते. पंत म्हणाले, की माझ्या मते त्यावर आग्रह धरला जाऊ शकतो आणि ते चौकटीत समाविष्ट केले जाऊ शकते. कारण जे लोक जाण्याचा निर्णय घेतील त्यांना काही प्रमाणात सुरक्षा पुरविण्याचा तो एक चांगला मार्ग असेल. त्यांनी सांगितले, की हा दौरा दोन्ही देशांधील संबंधांच्या दृष्टीने एक चांगले चिन्ह आहे. अमेरिकेचे माजी भारतीय राजदूत अरुण कुमार सिंह यांनी सांगितले, की सध्याच्या आंतरराष्ट्रीय अस्थिरतेच्या संदर्भात दोन्ही देश या संबंधांना महत्त्व देतात. हा या दौऱ्यातून मिळणारा संकेत आहे. भागीदारी अधिक घट्ट करण्यासाठी अनेक क्षेत्रांमध्ये पर्याय व मार्ग उपलब्ध आहेत आणि दोघांनाही त्याचा फायदा होईल.

## मोहित शर्माचा क्रिकेटला अलविदा
### 'आयपीएल' स्पर्धेत खेळणार की नाही?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

टीम इंडियाच्या वेगवान गोलंदाजाने तडकाफडकी क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्ती घेतली आहे. तो आयपीएलही खेळणार नाही. जाणून घ्या तो कोण आहे?

मोहित शर्मा याचा क्रिकेटला अलविदा टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज मोहित शर्मा याने आयपीएल स्पर्धेच्या १९व्या मोसमासाठी होणाऱ्या मिनी ऑक्शनआधी क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्त होत असल्याचे जाहीर केले आहे. मोहित १० वर्षांपासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून बाहेर होता. त्यामुळे मोहित कधीतरी निवृत्ती घेणार असल्याचे निश्चितच होते. मोहित टीम इंडियासाठी अखेरीस २०१५ मध्ये खेळला होता. त्यानंतर मोहित आयपीएल आणि इतर लीग स्पर्धेत खेळत होता. मात्र, मोहितने लीग क्रिकेटमध्येही न खेळण्याचा निर्णय घेतल्याने चाहत्यांना झटका लागला आहे.

**मोहित शर्माची आंतरराष्ट्रीय कारकीर्द**

मोहितने २०१३मध्ये एकदिवसीय क्रिकेटमधून आंतरराष्ट्रीय पदार्पण केले होते. मोहितने १ ऑगस्ट २०१३ रोजी झिंबाब्वे विरुद्ध एकदिवसीय पदार्पण केले. तर मोहितच्या एकदिवसीय कारकीर्दीतील दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा सामना हा शेवटचा ठरला. मोहित त्याच्या एकदिवसीय कारकीर्दीतील अखेरचा सामना हा दक्षिण आफ्रिकेविरुद्ध २५ ऑक्टोबर २०१५ रोजी खेळला होता. मोहितने एकदिवसीय क्रिकेटमध्ये २५ डावांत ३१ विकेट्स घेतल्या.

**मोहितची टी- ट्वेंटी कारकीर्द**

मोहितने ८ टी- ट्वेंटी आय सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. मोहितने या ८ सामन्यांमध्ये ६ विकेट्स घेतल्या आहेत. तसेच मोहितने आयपीएलमधील १२० सामन्यांमध्ये १३४ विकेट्स घेतल्या होत्या.

**मोहितने काय म्हटले?**

मनाच्या अंतकरणाने मी क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्त होत असल्याचे जाहीर करत आहे. हरियाणाचे प्रतिनिधित्व करण्यापासून टीम इंडियाची जर्सी परिधान करणे आणि आयपीएलमध्ये खेळण्यापर्यंत, हा प्रवास कोणत्याही आशिर्वादापेक्षा कमी नाही, असे मोहितने सांगितले.

**बीसीसीआयचे आभार**



मोहितने निवृत्ती जाहीर करताना बीसीसीआयचेही आभार मानले. माझ्या कारकीर्दीत मुख्य भूमिका बजावणाऱ्या हरियाणा क्रिकेट असोसिएशनचा मी आभारी आहे. तसेच मला मार्गदर्शन करुन विश्वास दाखविणाऱ्या अनिरुद्ध सरांचा मी आभारी आहे, असे मोहितने सांगितले. बीसीसीआय, प्रशिक्षक, सहकारी, आयपीएल फ्रँचायजी, सपोर्ट स्टाफ आणि सर्व मित्र या सर्वांची मी आभारी आहे. या सर्वांनी मला दिलेल्या पाठींबा आणि प्रेमासाठी मी त्यांचे आभारही मानले आहे.

## ब्यूटी विद ब्रेन : आयएएस स्मिता सभरवाल ने २२ साल की उम्र में यूपीएससी में हासिल की चौथी रैंक

यूपीएससी सिविल सेवा परीक्षा भारत की सबसे प्रतिष्ठित और कठिन परीक्षाओं में से एक है। हर साल लाखों उम्मीदवार इस परीक्षा में शामिल होते हैं, लेकिन सफलता केवल कुछ को ही मिलती है। ऐसी ही एक प्रेरणादायी कहानी है आयएएस स्मिता सभरवाल की, जिन्होंने मात्र २२ साल की उम्र में यूपीएससी क्रैक कर ऑल इंडिया चौथी रैंक हासिल की और ' ब्यूटी विद ब्रेन ' की मिसाल कायम की। आइए, उनके प्रेरणादायी सफर के बारे में जानें।

**स्मिता सभरवाल की पृष्ठभूमि**

स्मिता सभरवाल का जन्म १९ जून १९७७ को पश्चिम बंगाल के दार्जिलिंग में एक बंगाली परिवार में हुआ। वह एक सुसंस्कृत और शिक्षित परिवार से आती हैं। उनके पिता कर्नल प्रणब दास भारतीय सेना में थे, जबकि उनकी मां पूरबी दास गृहिणी हैं। स्मिता बचपन से ही पढ़ाई में असाधारण थीं।

**शैक्षणिक उत्कृष्टता : आयसीएसई टॉपर**



स्मिता ने हैदराबाद के सेंट ऐन हाई स्कूल, सिकंदराबाद से अपनी स्कूली शिक्षा पूरी की। उन्होंने राष्ट्रीय स्तर पर आयसीएसई परीक्षा में टॉप किया, जिससे उनकी बौद्धिक क्षमता स्पष्ट झाली।

**ग्रेजुएशन और यूपीएससी की तैयारी**

स्कूली शिक्षा के बाद स्मिता ने हैदराबाद के सेंट फ्रांसिस कॉलेज फॉर वुमन से कॉमर्स में डिग्री हासिल की। कॉलेज के दौरान ही उन्होंने यूपीएससी सिविल सेवा परीक्षा की तैयारी शुरू कर दी थी। टॉपर होने के बावजूद उनका पहला प्रयास सफल नहीं हुआ। लेकिन उन्होंने हार नहीं मानी, अपनी गलतियों से सीखा और दूसरी कोशिश के लिए और मेहनत की।

**ऑल इंडिया चौथी रैंक**

साल २००० में स्मिता ने अपने दूसरे प्रयास में सही रणनीति, आत्मविश्वास और मेहनत के बल पर यूपीएससी सिविल सेवा परीक्षा पास की। मात्र २२ साल की उम्र में उन्होंने ऑल इंडिया रैंक ४ हासिल की और भारतीय प्रशासनिक सेवा (आयएएस) के लिए चुनी गईं। उन्हें आंध्र प्रदेश (अब तेलंगाना) कैडर आवंटित हुआ।

**मुख्यमंत्री कार्यालय में पहली महिला अधिकारी**

वर्तमान में स्मिता सभरवाल तेलंगाना में पर्यटन और संस्कृति विभाग की प्रमुख सचिव के रूप में कार्यरत हैं। उन्होंने तेलंगाना मुख्यमंत्री कार्यालय में नियुक्त होने वाली पहली महिला अधिकारी बनकर इतिहास रचा।

**पति : आयपीएस अकुन सभरवाल**

स्मिता के पति आयपीएस अधिकारी अकुन सभरवाल हैं। दोनों के पिता रक्षा क्षेत्र में थे, और उनके परिवारों ने ही यह रिश्ता तय किया था। मसूरी के एलबीएसएनएए में प्रशिक्षण के दौरान स्मिता और अकुन बैचमेट थे, जहां उनकी दोस्ती शुरू हुई और बाद में प्रेम में बदली। स्मिता सभरवाल की कहानी मेहनत, दृढ़निश्चय और बौद्धिक क्षमता का शानदार उदाहरण है। उन्होंने २२ साल की उम्र में यूपीएससी जैसी कठिन परीक्षा पास कर लाखों युवाओं के लिए प्रेरणा बनाई। उनका यह सफर साबित करता है कि सही दिशा में मेहनत और आत्मविश्वास से कोई भी लक्ष्य हासिल किया जा सकता है।

## ' धुरंधर ' रिलीज झाल्यानंतर अजय देवगणच्या ' दे दे प्यार दे २ 'ची कमाई किती?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूड अभिनेता अजय देवगणच्या ' दे दे प्यार दे ' चित्रपटाला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला होता. आता त्याच्या सिक्वेलला म्हणजेच ' दे दे प्यार दे २ 'ला देखील खूप प्रेम मिळत आहे. चित्रपटाच्या दुसऱ्या भागात अजय आणि रकुल प्रीत सिंग यांच्यासोबत आर माधवन देखील आहे. आता ' दे दे प्यार दे २ 'च्या गुरुवार, दि. ४ डिसेंबर २०२५ च्या कमाईचे आकडे समोर आले आहेत. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर किती कमाई केली? ते जाणून घेऊया.

' दे दे प्यार दे २ ' चित्रपटाची गती बॉक्स ऑफिसवर मंदावली आहे. १४ नोव्हेंबरला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने २२ दिवसांत ७२.९७ कोटी रुपयांची एकूण कमाई केली आहे. परंतु रणवीर सिंगच्या ' धुरंधर ' आणि ' तेरे इश्क में ' या चित्रपटांच्या प्रदर्शनामुळे ' दे दे प्यार दे २ 'च्या कलेक्शनवर मोठा परिणाम झाल्याचे दिसत आहे.


पहिल्या भागाप्रमाणेच ' दे दे प्यार दे २ 'मध्ये अजय देवगण आणि सकुल प्रीत सिंग यांची प्रमुख भूमिका आहे. विशेष म्हणजे ' शैतान ' नंतर अजय देवगण आणि आर माधवन हे दोघे पुन्हा एकदा पडद्यावर एकत्र दिसले. १३५ कोटींच्या मोठ्या बजेटमध्ये बनलेल्या या चित्रपटाने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी ८.७५ कोटी रुपयांचे चांगली सुरूवात केली होती. सुरूवातीच्या धमाकेदार कमाईनंतर पुढील दिवसांमध्ये कलेक्शनमध्ये लक्षणीय घट झाली आहे.




सॅकनिल्कच्या सुरूवातीच्या अहवालानुसार चित्रपटाने २२ व्या दिवशी फक्त ०.१७ लाख रुपये कमावले आहेत. पहिल्या आठवड्यात चांगली कमाई केल्यानंतर दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवड्यात चित्रपटाचे कलेक्शन दिवसेंदिवस कमी होत गेले. ' धुरंधर 'सारख्या मोठ्या चित्रपटांच्या तुलनेत ' दे दे प्यार दे २ 'ला प्रेक्षकांना आकर्षित करण्यात यश मिळाले नाही.

# ही होती भारताची पहिली ट्रेन
## इंजिनांची नावे होती ' साहेब ', ' सिंध ' आणि 'सुलतान'; जाणून घ्या का ठेवली ही नावे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**





भारतात रेल्वे युगाची सुरूवात १६ एप्रिल १८५३ रोजी झाली. जेव्हा देशातील पहिली प्रवासी ट्रेन मुंबई (तेव्हाचे बॉम्बे) येथून ठाणे (तेव्हाचे ठाणा) येथे धावली. ही केवळ एक ट्रेन नव्हती, तर भारतातील आधुनिक वाहतुकीच्या नव्या युगाचे प्रतीक बनली.

**पहिली सार्वजनिक प्रवासी ट्रेन**

ही ट्रेन ग्रेट इंडियन पेनिनसुला रेल्वेने चालविली होती. जी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या अधीन कार्यरत होती. दुपारी ३.३५ वाजता मुंबईच्या बोरीबंदर स्थानकातून (आजच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसजवळ) ट्रेनने प्रस्थान केले. याप्रसंगी २१ तोफांची सलामी देण्यात आली. ज्यामुळे हा क्षण ऐतिहासिक ठरला. ३४ किलोमीटर (सुमारे २१ मैल) अंतर कापत ही ट्रेन ठाणे येथे पोहोचली. यात साधारण १४ डबे होते आणि ४०० निमंत्रित अतिथी ज्यात ब्रिटिश अधिकारी, भारतीय राजा-महाराजा, युरोपीय रहिवासी तसेच काही भारतीय प्रतिनिधी सामील होते.

**तीन वाफेवर चालणारी इंजिने ' साहेब ', ' सिंध ' आणि 'सुलतान'**

या ऐतिहासिक ट्रेनला तीन वाफेच्या इंजिनांनी ओढले होते ' साहेब ', ' सिंध ' आणि ' सुलतान '. ही सर्व जीआयपी १ वर्गातील इंजिने ब्रिटनहून आयात केली होती. या इंजिनांची नावे त्याकाळच्या ब्रिटिश वसाहती प्रभावाचे तसेच भारतीय सांस्कृतिक मिश्रणाचे प्रतीक होती.
' ग्रेट इंडियन पेनिनसुला रेल्वे 'ने आपल्या पहिल्या जहाजांना आणि ट्रेनना भारतीय ओळखीवर आधारित नावे देण्याचा प्रयत्न केला. जेणेकरून औद्योगिक विकासाला स्थानिक संदर्भाशी जोडता येईल.

**इंजिनांच्या नावांचा अर्थ**

साहेब : हे नाव इंग्रजीतील ' सर ' किंवा ' मालक ' यासाठी वापरल्या जाणाऱ्या ' साहेब ' या शब्दावरून घेतले गेले. त्या काळात ब्रिटिश अधिकाऱ्यांसाठी ही उपाधी सामान्य होती. ' साहेब ' हे नाव ब्रिटिश सत्ता व प्रभुत्वाचे प्रतीक होते.
**सिंध :** हे नाव सिंधू नदी किंवा सिंध प्रांतावरून प्रेरित होते (जो आज पाकिस्तानचा भाग आहे). हा प्रदेश ब्रिटिशांच्या रेल्वे विस्ताराच्या योजनांमध्ये महत्त्वाचा होता, म्हणून ' सिंध ' हे नाव साम्राज्याच्या विस्ताराचे द्योतक होते.
**सुलतान :** हे नाव भारतीय उपखंडातील मुस्लिम शासकांची विशेषतः दिल्ली सल्तनत आणि मोगलकालाची आठवण म्हणून ठेवण्यात आले. ब्रिटिशांनी भारतीय इतिहास व संस्कृतीशी जोड निर्माण करण्यासाठी असे नावे स्वीकारली. जेणेकरून भारतीय जनतेशी जवळीक निर्माण होईल.

**भारतातील रेल्वे युगाची सुरूवात**

या ट्रेनने भारतात रेल्वे युगाची अधिकृत सुरूवात केली. जरी यापूर्वी १८५२ मध्ये झाशीजवळ माझगाव परिसरात एक छोटी चाचणी ट्रेन चालवली गेली होती, तरी ती सार्वजनिक प्रवासी ट्रेन नव्हती. तत्कालीन गव्हर्नर-जनरल लॉर्ड डलहौजी यांनी या प्रकल्पाला प्रोत्साहन दिले. पुढे संपूर्ण भारतात रेल्वे जाळ्याचा प्रचंड विस्तार झाला. भारताच्या पहिल्या ट्रेनने फक्त प्रवाशांनाच नाही, तर विकास, औद्योगिकीकरण आणि आधुनिकतेकडे जाणाऱ्या संपूर्ण सभ्यतेलाच गती दिली.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

## पान १ वरून

### विद्यार्थिनींच्या छेडखानीविरूद्ध निघाला अमळनेरचा पहिला महाआंदोलन– मोर्चा

सर्वांनी 'खरा तो एकची धर्म' ही प्रार्थना म्हणून शिस्तीने प्रांताधिकारी कार्यालयावर मोर्चा नेला.

यावेळी फार्मसी महाविद्यालय, सुमन क्लासेस, साई इंग्लिश ॲकेडमी, साटोटे मॅथ्स क्लासेस, साने गुरुजी विद्यालय, राजमुद्रा इंग्लिश क्लासेस, प्रफुल्ल कॉमर्स ॲकेडमी, आयकेडी मॅथ्स ॲकेडमी, सरस्वती इंग्लिश क्लासेस, माऊली मॅथ्स क्लासेस, विद्या क्लासेस, एन. टी. मुंदडा ग्लोबल व्ह्यू स्कूल, सॉफ्टेक कॉम्प्युटर एज्युकेशन, द्रौ. रा. कन्या शाळा, प्रताप महाविद्यालयातील विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

यावेळी अमळनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव संदीप घोरपडे, खानदेश शिक्षण मंडळाचे माजी संचालक नीरज अग्रवाल, प्रदीप अग्रवाल, जितेंद्र जैन, योगेश मुंदडे, ख्यातनाम बिल्डर्स ओमप्रकाश मुंदडा, कल्याण पाटील, डॉ. अनिल शिंदे, हरी वाणी, मंगळ ग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, श्रीमती माधुरीताई पाटील, खासगी क्लासेस संघटनेचे अध्यक्ष ॲड. भय्यासाहेब मगर, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष बी. के. सूर्यवंशी, बन्सीलाल भागवत गुरुजी, गजेंद्र साळुंखे, द्रौ. रा. कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सिमा सूर्यवंशी, प्रा. डी. डी. पाटील, म. वा. मंडळाचे संचालक डॉ. महेश पाटील, ॲड. विवेक लाठी, रावसाहेब पाटील, ग्लोबल स्कूलचे प्राचार्य लक्ष्मण, आयकेडी मॅथ्स क्लासेसचे संचालक किरण महाजन आदी उपस्थित होते.

### आशीर्वाद पॅनलला लाभला अनेक मान्यवरांचा भरभक्कम आशीर्वाद

बिनविरोध व्हावी, अशी अनेकांनी इच्छा व्यक्त केली.

यावेळी पॅनलप्रमुख कुंदनलाल अग्रवाल, बजरंगलाल अग्रवाल, किर्तीकुमार शहा, मोहनलाल जैन व विनोद पाटील, आशीर्वाद पॅनलचे उमेदवार नीरज अग्रवाल, योगेश मुंदडे, प्रदीप अग्रवाल, कल्याण पाटील, डॉ. संदेश गुजराथी, डॉ. अनिल शिंदे, जितेंद्र जैन, हरी भिका वाणी यांच्यासह कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. शिवाजीराव पाटील, ख्यातनाम बिल्डर्स ओमप्रकाश मुंदडा, सरजूशेठ गोकलाणी, रामदास निकुंभ (नाना), मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, भाजपचे तालुकाध्यक्ष हिरालाल पाटील, शहराध्यक्ष योगेश महाजन, सिंधी जनरल पंचायतचे अध्यक्ष चेलाराम सैनानी, कॉंग्रेसचे शहराध्यक्ष मनोज पाटील, श्रीमती माधुरीताई पाटील, जितेंद्र देशमुख, सौ. राजेश्रीताई पाटील, सौ. वसुंधराताई लांडगे, ॲड. तिलोत्तमाताई पाटील, शविआचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जितेंद्र ठाकूर, खा. शि. मंडळाचे माजी संचालक डॉ. शशांक जोशी, माजी नगरसेवक घनश्याम पाटील, मनिष जोशी, माजी उपनगराध्यक्ष लालचंद सैनानी, अमेय मुंदडा, शुभम मुंदडा, प्रशांत राणे, मुख्तार खाटीक, अनिल पाटील सर, रवींद्र पाटील, विनोद अग्रवाल, संजय पाटील (भूत बापू), प्रताप शिंपी, निवृत्त शिक्षक एम. आर. खांजोडकर व ए. सी. सोनवणे, रवींद्र जैन (मुन्ना), लक्ष्मण महाजन (पप्पू), उदय खैरनार, महेश पाटील, पप्पू सैनानी, श्रीनाथ पाटील, नीलेश भांडारकर, दिलीप ठाकूर, प्रा. ई. टी. चौधरी, संजय शुक्ल, दिनेश शेलकर, प्रा. एस. के. सोमाणी, सोमनाथ ब्रह्मे, प्रा. एस. आर. पाटील, उद्योगपती सुरेश नारायण पाटील, जेडीसीसी बॅंकेचे निवृत्त व्यवस्थापक संजय प्रल्हाद पाटील, भरतसिंग परदेशी, दीपक पाटील, अनिल रायसोनी आदींसह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.


“ खानदेश शिक्षण मंडळाची आतापर्यंत जी प्रगती झाली आहे, ती पुढच्या काळातही सुरू राहो. अमळनेरचे विद्यार्थी आणि पालक यांना शिक्षण क्षेत्रातील उत्तमातील उत्तम व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आपले सर्वांचे आशिर्वाद पॅनल यशस्वी राहो.

**– अनिलदादा पाटील, आमदार, अमळनेर.**

### महातेजाय मार्गदर्शिका ठरणार देशातील उच्चांकी खपाचे मासिक

मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार, दि. ५ डिसेंबर रोजी महातेजाय मार्गदर्शिकेचे अनेक मान्यवरांच्या हस्ते विधिवत श्री मंगळग्रह मंदिर येथे प्रकाशन करण्यात आले. १६ ग्लेझ पानी या मासिकाची किंमत १० रुपये असेल. मात्र, श्री मंगळग्रह मंदिरात अभिषेक करणाऱ्या प्रत्येकाला वर्षभर हे मासिक भारतात व भारताबाहेरही टपालाद्वारे मोफत मिळणार आहे. हे मासिक मराठी व हिंदी या दोन भाषांमध्ये प्रसिद्ध होईल. मासिकाची पहिल्याच महिन्यात महातेजाय मार्गदर्शिकाच्या ५ हजार कॉपिज प्रिंट होतील. दर महिन्याला कॉपिजची संख्या ५ हजाराने वाढणार आहे. डिसेंबर २०२६ मध्ये महातेजाय मार्गदर्शिकेचा खप ७० हजार कॉपिज असेल. हल्ली एखाद्या मासिकाची सुरूवातच ५ हजार अंकांच्या खपाची असणे असे उदाहरण देशभरात कोठेही नाही. इतकेच नव्हे, तर एखाद्या मासिकाचा खप ७० हजार कॉपिजपर्यंत जाणे हे सुद्धा देशातील खूप मोठे रेकॉर्ड असणार आहे.

अत्यंत आगळ्यावेगळ्या शैलीचे, अत्यंत ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी असलेल्या प्रिंटिंग प्रेसमधून छपाई होणारे व कायम संग्रही ठेवावेसे वाटेल असा मजकूर असणारे हे मासिक असेल.




“ **महातेजाय मार्गदर्शिका प्रत्येकाला हवेहवेसे वाटावे यासाठी आम्ही प्रचंड मेहनतीने मजकूर तयार करून त्यात प्रसिद्ध करणार आहोत. या मासिकाचा खप फक्त भारतातच नव्हे, तर जगात सर्वाधिक व्हावा यासाठीची आम्ही योजना आखित आहोत. गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये या मासिकाचा समावेश व्हावा, हे माझे स्वप्न आहे. हे सारे काही माझ्या अमळनेर या पवित्र कर्मभूमीतून होणार आहे, याचा मला अभिमान आहे.**

– पुषंद (खिलू) ढाके, संपादक, महातेजाय मार्गदर्शिका.

## महाआंदोलन-मोर्चातील क्षणचित्रे




## आजचे वाढदिवस



ॲड. राजेंद्र चौधरी



संदीप बनचोडे, शिक्षक



दीपक माळी,पोलीस

**सबसे तेज ग्लोबल महातेज**

# भारतातील 'हे' घर आहे दोन देशांमध्ये विभागलेले!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातून इतर देशात जायचे असेल तर फ्लाईटने जावे लागेल अथवा चांगला रस्ता शोधावा लागेल. मात्र, देशातील एका घराविषयी तुम्हाला मोठे आश्चर्य वाटेल.

देशातील एका घराविषयी तुम्हाला मोठे आश्चर्य वाटेल. दोन खोल्यांच्या घरात पोहोचलात तर एक खोली ही भारतात तर दुसरी खोली ही दुसऱ्या देशात आहे. हे गाव आणि हे घर त्याच्या या 'हटके' कारणामुळे जगप्रसिद्ध झाले आहे. जगातील अनेक लोक खास या घराला भेट देण्यासाठी कित्येक किलोमीटरचा प्रवास करत येतात. तुम्हाला हे गाव आणि हे घर कुठे आहे ते माहिती आहे का ? हे घर दोन देशांच्या सीमेवर आहे. या दोन खोल्यांच्या झोपडीवजा घरातील एक खोली भारताच्या हद्दीत तर दुसरी खोली ही आपला शेजारी देश ब्रह्मदेश म्हणजे आताचा म्यानमारमध्ये आहे. एकाच घरातून भारत आणि म्यानमारची सीमा जाते. हे अनोखे घर नागालॅंड राज्यातील लोंगवा गावात आहे. हे गाव भारत–म्यानमारच्या सीमेवर वसलेले आहे. हे अनोखे घर पाहण्यासाठी दूरवरून लोक येतात. कित्येक किलोमीटरचा प्रवास करून आलेले लोक येथील निसर्गाच्याही प्रेमात पडतात. या घराचे एक खास वैशिष्ट्ये म्हणजे याचे किचन म्यानमार या देशात आहे, तर बेडरूम भारतात आहे. यामुळे या घरात झोपण्यासाठी भारतात यावे लागते. तर पोट भरण्यासाठी म्हणजेच स्वयंपाकासाठी थेट म्यानमार देशात जावे लागते. हे अंतर चार बोटे देखील नाही. विशेष म्हणजे हे घर गावातील प्रमुखाचे आहे. त्याच्या घरातून दोन्ही देशाची सीमा जाते. या घराला फ्री मुव्हमेंट रिझीमचा खास दर्जा देण्यात आला आहे. असा दर्जा प्राप्त हे एकमेव घर आहे. या घरातील नागरिकांना दुहेरी नागरिकत्व मिळालेले आहे. ते भारतीय नागरिक आहेतच तर म्यानमारचेही ते रहिवाशी आहेत. बाजारापासून ते इतर अनेक सेवांसाठी येथील लोक हे दोन्ही देशात मुक्तपणे संचार करतात.




# नारळ फोडण्याची साऊथ स्टाईल!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तुम्हालाही नारळ फोडण्यात अडचण येत असेल, किंवा हातोडा मारून–मारून त्रास होत असेल, तर ही पारंपरिक साऊथ इंडियन पद्धत नक्की वापरून पाहा. नारळाची पाने आधार देते, ठोके हलके असतात आणि नारळ अगदी ५ मिनिटांत तुटतो. शिवाय नारळपाणी देखील वाचते.

नारळ फोडणे ही अनेकांसाठी एक मोठी 'टेंशनची' गोष्ट असते. कित्येकदा हातावर ताण येतो, काही वेळा नारळ हवेत उडून बाजूला पडतो, तर कधी ठिकठिकाणी तुकडे उडतात. विशेषतः स्वयंपाकात ताजे नारळ लागले, की आधी नारळ फोडण्याचीच मेहनत अधिक वाटते. मात्र, दक्षिण भारतात नारळ फोडण्याचे काही अनोखे, सोपे आणि अगदी सुरक्षित असे उपाय पिढ्यानपिढ्या चालत आले आहेत. हे उपाय इतके सोपे आहेत, की पाहता क्षणी वाटेल, की इतके सोपे असू शकते? एका म्हाताऱ्या आजोबांनी सांगितलेला आणि आजही अनेक घरांमध्ये वापरण्यात येतो. यासाठी ना भारी हातोडा लागतो, ना जास्त शक्ती, आणि ना तुकडे उडण्याची भीती उलट ५ मिनिटांत नारळ सहज उघडतो.

सर्वात आधी एक मजबूत नारळाचे पान घ्या नारळाच्या झाडाची सुकलेली किंवा अर्ध सुकलेली पाने सर्वोत्तम. यात लवचिकता आणि मजबुती असते. पानाचा एक भाग वळवून 'रिंग' किंवा वर्तुळ तयार करा. ही रिंग नारळाला स्थिर ठेवते. नारळ पानांच्या या वर्तुळात व्यवस्थित बसवा नारळाला नैसर्गिक खाच असते. ती खाच पानांच्या वर्तुळाच्या एका बाजूस ठेवली तर नारळ स्थिर बसतो. त्यामुळे नारळ फोडताना तो हलत नाही किंवा उडत नाही. नारळ फोडण्याची सोपी पद्धत आता नारळावर हलक्या हाताने ठोके द्या लोखंडी हातोड्याने जोरजोरात मारण्यापेक्षा, दक्षिण भारतात 'कोना' किंवा छोटा दगड वापरला जातो. नारळाच्या नैसर्गिक रेषेवर जो एक कमकुवत भाग असतो हलके–पण नियमित ठोके द्या. फक्त ५– ६ ठोके दिले की क्रॅक दिसू लागतो. क्रॅक दिसला की दोन्ही हातांनी नारळ अर्धा करा या वेळी पानांचा आधार असल्याने नारळ सहज वेगळा होतो. सगळ्यात मोठा फायदा म्हणजे नारळाचे पाणी सांडत नाही! ते थेट एखाद्या वाटीत ओतता येते. विज्ञान काय सांगते ही पद्धत पारंपरिक आहे, पण विज्ञान सांगते की नारळाची नैसर्गिक रेषा किंवा कमजोर 'सीम' ओळखून त्यावर सातत्याने हलके ठोके दिले, की त्यातील फायबर लवकर तुटतात.




# जळोद येथे तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– तालुक्यातील जळोद येथील पंकज पोलाद सोनवणे (वय २५) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवार, दि. ५ डिसेंबर रोजी दुपारी निदर्शनास आली.

पोलिसांनी सांगितले, की पंकजचे कुटुंबीय लग्नकार्यासाठी बाहेरगावी गेले होते. घरात तो एकटाच होता. त्याचे काका रघुनाथ सुका धनगर यांनी पाहणी केली. यावेळी पंकजने राहात्या खोलीतील छताच्या लोखंडी कडीला दोरीने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. हिरामण सोनवणे, किरण कोळी, मसूद खाटीक यांनी त्यास ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी मृत घोषित करण्यात आले. रघुनाथ धनगर यांनी दिलेल्या माहितीवरून अमळनेर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद झाली आहे.





## ॥ श्री गुरुदेव दत्त ॥

गुरूंचे स्मरण म्हणजे संरक्षक कवच. श्री गुरुचरित्राचे पठण म्हणजे नित्य नूतन होत राहणारा आशीर्वाद. बाहेरच्या जगाला ते कधीच दिसणार नाही. परंतु या अनुभूतीला मनात स्थान दिल्यावर जाणवते, की बळ कुठून येते, धैर्य कोण देते आणि संकट कोणापर्यंत पोहोचतच नाही.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त !! श्री स्वामी समर्थ!!**

## मना सज्जना...

# प्रभाते मनी राम चिंतित जावा...



श्लोक ३

**प्रभाते मनी राम चिंतित जावा ।**
**पुढे वैखरी राम आधी वदावा ।**
**सदाचार हा थोर सांडू नये तो ।**
**जनी तोचि तो मानवी धन्य होतो ॥३॥**

रात्रीच्या चार प्रहरांतील सर्वोत्तम प्रहर म्हणजे ब्रह्ममुहूर्त. सूर्योदयापूर्वीचा पहाटे ४ ते सकाळी ६ वाजेदरम्यानचा काळ हा ब्रह्ममुहूर्त म्हटला जातो. योगी, साधक यांच्यासाठी हा प्रहर साधनायोग्य प्रहर. या काळात सर्व चराचराला जाग येत असते. या काळात उत्साही आल्हाददायक वातावरण असते. उषा पूर्व दिशेला लालीमा घेऊन सूर्याच्या स्वागताला सज्ज होत असते. अशा वेळी हा प्रहर मनाच्या एकाग्रतेसाठी सर्वोत्तम असतो. या प्रहरात केलेले चिंतन, मनन हे मनाला, चित्तवृत्तीला दिवसभर उत्साही आणि ताजेतवाने ठेवते म्हणून समर्थ म्हणतात,
प्रभाते मनी राम चिंतीत जावा...

प्रभात समयी प्रभू श्रीरामचंद्र यांचे चिंतन करावे. सर्वोत्तमाचे चिंतन करावे. त्यामुळे मनाची एकाग्रता होऊन चित्त स्थिर होते. या प्रहरात मन निर्विचार अवस्थेत असते. त्यामुळे चिंतनाचा खोलवर परिणाम दिसून येतो. या काळात केलेले पाठांतर स्मृतीत साठविले जाते. पुढे वैखरी म्हणजे वाणीने सर्वांत आधी रामाचे नाव घ्यावे म्हणजे भजन करावे. त्यानंतर आपला दिनक्रम आचरण करावा. समर्थ दिनक्रम सांगतात तो असा...
**प्रातःकाळी उठावे । काही पाठांतर करावे ।**
**यथानशक्ती आठवावे । सर्वोत्तमाशी ।**
**मुखमार्जन प्रातःस्नान । संध्या तर्पण देवतार्चन ।**
**पुढे वैश्वदेव उपासन । यथासांग ।**
दैनंदिन कर्मे करताना प्रथम रामनामाच्या उच्चाराने दिवसाची सुरूवात करावी.

**समर्थ पुढे सांगतात...**
**सदाचार हा थोर सांडू नये तो...**

सदाचार हा केवळ चार अक्षरी शब्द नाही. सदाचार म्हणजे प्रयत्नपूर्वक अंगीभूत केलेले गुण. आपल्या दैनंदिन व्यवहारात आपले वागणे-बोलणे कमालीचे शिस्तबद्ध, अनुकरणीय ठेवायचा आपण प्रयत्न करीत असतो. म्हणजेच उत्तम गुणांचा अंगीकार केलेला असतो. या आपल्या अंगी असलेल्या उत्तम गुणांचा त्याग कोणत्याही परिस्थितीमध्ये होणार नाही, याची साधकाने दक्षता घ्यावी. लोकांत प्रतिष्ठा ही सद्गुणी व्यक्तीलाच लाभते. सद्गुणांचा परिपाक म्हणजे सदाचार. जनमानसात असलेले आपले वागणे-बोलणे हे आपल्या अभ्युदयाला कारण असते. आपल्या आचरणाने लोक संतोष पावतात किंवा दुःखी होतात तेव्हा आपले आचरण हे नेहमी उत्तम असले पाहिजे. म्हणजे लोकमान्यता मिळते.
**मरोनी कीर्ती उरवावी । नुरवावी अपकीर्ती ते ।**
**धन्य धन्य म्हणे लोक । सक्रिया करता बरी ।**

सदाचारी व्यक्तीलाच जनमानसात प्रतिष्ठा लाभते. मानवी जन्माची धन्यता ही प्रतिष्ठा मिळविण्यात असते. कीर्ती रूपाने या जगात आपली ओळख राहावी ही इच्छा प्रत्येक व्यक्तीस असते.

मनाचे श्लोक लिहिताना समर्थांनी राम नामाच्या स्मरणाचे महत्त्व वेळोवेळी विशद केले आहे. पुढे येणाऱ्या श्लोक क्रमांक ६७ ते ७६ या १२ श्लोकांतील प्रत्येक श्लोकातील शेवटचे चरण ‘ प्रभाते मनी राम चिंतित जावा’ असेच आहे. ते यथावकाश पुढे येथीलच.

**जय जय रघुवीर समर्थ!**

**– भाऊसाहेब देशमुख,**
**अमळनेर,**
**मो. : 94203 89541**

# संकष्ट चतुर्थी : श्रद्धा, विज्ञान आणि संस्कृतीचा सुंदर संगम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय सणपरंपरेत व्रतांची एक समृद्ध परंपरा आहे. त्यात संकष्ट चतुर्थी किंवा सर्वसाधारण बोलीत चतुर्थी, ही गणेशभक्तांच्या मनात विशेष स्थान घेत आलेली आहे. प्रत्येक महिन्यात येणारा हा उपवास केवळ धार्मिकच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि खगोलशास्त्रीय अर्थांनीही महत्त्वाचा मानला जातो.



### धार्मिक पार्श्वभूमी : गणेशाचे संकटमोचक रूप

संकष्ट चतुर्थी हा दिवस गणपती बाप्पांच्या ‘ संकटमोचन ’ रूपाची उपासना करणारा मानला जातो. ‘ संकट + हरी ’ यांपासून ‘ संकटहरी ’ हा शब्द तयार होतो. अर्थात संकटांचा नाश करणारा. पौराणिक मतानुसार या दिवशी उपवास करून चंद्रदर्शन केल्यास कष्ट, अडचणी, आरोग्यविषयक समस्या आणि कौटुंबिक भांडणांचे संकट दूर होते. या दिवशी श्रीगणेश यांना दुर्वा, मोदक, लाडू, लाल फुले आणि ऊस अर्पण करण्याची प्रथा आहे. अंगारकी चतुर्थी (मंगळवारची संकष्टी) ही वर्षातील सर्वांत महत्त्वाची मानली जाते.

### उपासाचे स्वरूप : नियम, विधी आणि पारंपरिक आचार

उपासाच्या दिवशी पुढील प्रथा पाळल्या जातात. **१) उपवास** : दिवसभर ‘ फलाहार ’ किंवा ‘ निर्जल उपवास ’. चंद्रदर्शनानंतरच खास करून उपवास सोडण्याची रीत. **२) पूजा-विधी** : श्रीगणेश यांची पंचोपचार/षोडशोपचार पूजा संकटनाशन स्तोत्र, गणपती अथर्वशीर्ष, संकष्ट-व्रतकथा, चंद्रदर्शन आणि अर्घ्य देणे (पाण्यात चंदन, अक्षत, फुले). **३) नैवेद्य** : मोदक, खीर, पंचखाद्य, तिळाचे लाडू. भूपाळी मोदक किंवा तुपातील गरम मोदक ही विशेष ख्याती असलेली तयारी.

### खगोलशास्त्रीय पैलू : चंद्रदर्शनाचा अर्थ

संकष्ट चतुर्थी हा कृष्ण पक्षातील चतुर्थी तिथीस येतो. उपवास चंद्रदर्शनानंतर सोडण्यामागे आयुर्वैज्ञानिक आणि खगोलशास्त्रीय कारणे असल्याचे संशोधक सांगतात. सायंकाळी वाढता चंद्र (शुक्ल चतुर्थी नव्हे) पाहणे ही मनःशांती आणि एकाग्रतेशी संबंधित प्रक्रिया मानली जाते.

### सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व

महिलांमध्ये विशेष लोकप्रिय. कोकण, विदर्भ, महाराष्ट्र, कर्नाटक आदी भागांत संकष्टी हा महिलांसाठी कुटुंबविषयक शुभ व्रत मानले जाते.

### घराची सुख-समृद्धी

पती-पत्नीमध्ये सौहार्द, मुलांच्या स्वास्थ्यासाठी प्रार्थना, समुदायभाव वाढविणारा सण. अनेक ठिकाणी संकष्टीच्या दिवशी सामूहिक हळदी-कुंकू, सामूहिक गणेशपूजा केल्या जातात.

### महिलांचे भजन-कीर्तन

अशा कार्यक्रमांची परंपरा आहे.

### आहार आरोग्यदृष्टीने व्रताचा अर्थ

उपवासाच्या दिवशी हलका आहार, फळे, दूध यांचा वापर शरीराला एक डिटॉक्स दिवस देतो. कमी तेलकट व पचनसंस्थेला विश्रांती मिळण्यासाठी या दिवशी कमी तेलकट आहार घ्यावा.

### मन:शांतीसाठी मंत्रपठण व ध्यान

या गोष्टी शरीर-मनावर सकारात्मक परिणाम घडवितात.

### आधुनिक संदर्भ

परंपरा टिकवून आधुनिक जीवनाशी सुसंगती साधता येते. आजच्या जलद जीवनशैलीतही संकष्ट चतुर्थीचे व्रत कौटुंबिक बांधिलकी आणि भावनिक आधार देणारे म्हणून पुनरुज्जीवित होत आहे. सोशल मीडियामुळे कथा, मंत्र, वेळापत्रक सहज समजते. घरगुती पूजेबरोबर अनेक कुटुंबे पर्यावरणपूरक वर्तन पाळत आहेत. तरुण पिढीही ‘ माइंडफुलनेस ’, ‘ रूटीन ’ आणि ‘ स्पिरिच्युअल फिटनेस ’ म्हणून या व्रताकडे पाहू लागली आहे.

### प्रदेशनिहाय वैशिष्ट्ये

**महाराष्ट्र** : कोकणात उसाचा नैवेद्य.
**विदर्भ :** तीळ-गुळाचे लाडू.
कर्नाटक/गोवा : उडपीमंगळूर येथे खास ‘ कुडबू’ (मोदकाचा प्रकार).
**उत्तर भारत** : दिल्ली, राजस्थानात ‘ सकट चौथ ’ म्हणून प्रचलित मातांकडून पुत्रासाठी प्रार्थना.

### संकष्ट चतुर्थीचे सांस्कृतिक संदेश

१) संकटांवर मात, जीवनात अपयश किंवा अडचणींना धैर्याने सामोरे जाण्याची प्रेरणा.
२) एकाग्रता व शिस्त नियमित व्रत-पूजेने मनःशक्ती वाढते.
३) सामुदायिक ऐक्य एकत्र पूजन व सण साजरा करून लोकांना जोडते.
४) निसर्गाशी नाते चंद्रदर्शन, पौर्णिमा-अमावास्यांचे चक्र यांची ओळख.

संकष्ट चतुर्थी हा सण, उपवास किंवा धार्मिक कर्तव्य यापेक्षा अधिक काही सांगतो. तो निसर्ग, मन आणि श्रद्धेतील समतोलाचा दिवस आहे. परंपरा आणि आधुनिकता यांच्या संगमात हा सण आजही लोकांना संयम, सकारात्मकता आणि संकटावर मात करण्याची शक्ती देतो. भारतीय संस्कृतीतील हा छोटा पण प्रभावी उत्सव, आपल्या आराध्य श्रीगणेश यांच्या आशीर्वादाने जीवनात ‘ संकट-निर्मूलन ’ आणि ‘ आनंदप्राप्ती ’ची भावना जागवतो.

# मंत्राचा जप १०८ वेळा का करावा ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शास्त्रज्ञांच्या मते जपमाळाच्या १०८ मणी आणि सूर्याच्या कला यांच्यात खोल संबंध आहे. सूर्य एका वर्षात २१६००० कला बदलतो आणि वर्षातून दोनदा आपली स्थिती देखील बदलतो.

हिंदू पौराणिक कथेनुसार मंत्रोच्चारासाठी आपण वापरत असलेल्या जपमाळातील मण्यांची संख्या १०८ असते. शास्त्रात १०८ क्रमांकाला खूप महत्त्व आहे. यामागे अनेक धार्मिक, ज्योतिषशास्त्रीय आणि वैज्ञानिक मान्यता आहेत. जपमाळेत फक्त १०८ मणी का असतात? मंत्रजपासाठी माळ का वापरावी? या मागचे नेमके कारण अनेकांना नाही माहिती.

हिंदू धर्मग्रंथानुसार रुद्राक्षाची जपमाळ मंत्रोच्चारासाठी उत्तम आहे. रुद्राक्ष हे महादेवाचे प्रतीक मानले जाते. रुद्राक्षमध्ये सूक्ष्म जंतूंचा नाश करण्याची शक्ती देखील आहे आणि रुद्राक्ष वातावरणातील सकारात्मक ऊर्जा शोषून घेतो तसेच साधकाच्या शरीरात उर्जा निर्माण करतो. रुद्राक्षा व्यतिरिक्त ही माळा तुळशी, स्फटिक, मोती किंवा रत्नांची देखील बनविली जाते. प्राचीन काळापासून महान तपस्वी, ऋषी-मुनी या उपायाचा अवलंब करत आले आहेत.
महत्त्वाची माहिती आणि नियम.. देवपूजेसाठी कुबेर मुद्रा अत्यंत महत्त्वाची आहे, त्यानंतर दान आवश्यक आहे. मंत्राचा जप करताना माळ अवश्य वापरावी. जपमाळेशिवाय मंत्राच्या जपाचे पूर्ण फळ प्राप्त होत नाही. जो कोणी जपमाळेच्या साहाय्याने मंत्राचा जप करतो, त्याच्या मनोकामना लवकर पूर्ण होतात. जर मंत्रजप निश्चित क्रमांक १०८ नुसार केला तर उत्तम आहे.



शास्त्रानुसार जपमाळाच्या १०८ मण्यांची संख्या संपूर्ण निरोगी व्यक्ती दिवसात किती वेळा श्वास घेते याच्या संख्येशी संबंधित आहे. साधारणपणे २४ तासांत एक व्यक्ती २१६०० वेळा श्वास घेते. दिवसाच्या २४ तासांपैकी १२ तास दैनंदिन कामात घालवले जातात आणि उरलेल्या १२ तासांत माणूस १०८०० वेळा श्वास घेतो. शास्त्रानुसार, व्यक्तीने प्रत्येक श्वासात १०८०० वेळा म्हणजेच पूजेसाठी निर्धारित वेळेत १२ तास देवाचे ध्यान केले पाहिजे, परंतु हे शक्य नाही. म्हणूनच १०८०० श्वासांच्या संख्येतून शेवटची दोन शून्ये काढून नामजपासाठी १०८ संख्या निश्चित करण्यात आली आहे. या संख्येच्या आधारे नामजपाच्या जपमाळेत १०८ मणी आहेत.

### वैज्ञानिक महत्त्व

शास्त्रज्ञांच्या मते जपमाळाच्या १०८ मणी आणि सूर्याच्या कला यांच्यात खोल संबंध आहे. सूर्य एका वर्षात २१६०० कला बदलतो आणि वर्षातून दोनदा आपली स्थिती देखील बदलतो. उत्तरायण सहा महिने आणि दक्षिणायन सहा महिने असते. म्हणून, सूर्य सहा महिन्यांच्या कालावधीत १०८००० वेळा त्याच्या कला बदलतो. या क्रमांकातले १०८००० मधील शेवटचे तीन शून्य काढून १०८ मण्यांची माळ निश्चित केली आहे. माळाचा प्रत्येक मणी सूर्याच्या प्रत्येक कलेचे प्रतीक आहे. सूर्यच माणसाला तेजस्वी बनवतो, सूर्य ही एकमेव दृश्य देवता आहे, म्हणूनच सूर्याच्या कलांच्या आधारे दानांची संख्या १०८ निश्चित करण्यात आली आहे.

जपमाळातील १०८ मण्यांची संख्या संपूर्ण विश्वाचे प्रतिनिधित्व करते... ज्योतिषशास्त्रानुसार, संपूर्ण ब्रह्मांड १२ भागांमध्ये (राशी) विभागले गेले आहे. मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धनु, मकर, कुंभ आणि मीन अशी या १२ राशींची नावे आहेत. सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू आणि केतू हे नऊ ग्रह या १२ राशींमध्ये फिरतात. म्हणून, जर १२ राशीच्या संख्येत ग्रहांची संख्या ९ ने गुणाकार केली तर संख्या १०८ होईल. ज्योतिषशास्त्रानुसार या संख्येच्या आधारे जपमाळात १०८४ मणी असतात.

दुसऱ्या मान्यतेनुसार १०८ मणी माळा ठेवण्यामागे ऋषीमुनींनी ज्योतिषशास्त्रीय कारणे सांगितली आहेत... शास्त्रानुसार एकूण २७ नक्षत्रे सांगितली आहेत. प्रत्येक नक्षत्रात ४ चरण असतात आणि एकूण २७ नक्षत्रांचे चरण १०८ असतात. मालेचा प्रत्येक दाणा नक्षत्राच्या प्रत्येक टप्प्याचे प्रतिनिधित्व करतो. मंत्रोच्चाराच्या माळेच्या वरच्या बाजूला एक मोठा दाणा असतो ज्याला सुमेरू म्हणतात. नामजपाची संख्या सुमेरूपासून सुरू होते आणि येथेच संपते. नामस्मरणाचे एक चक्र सुमेरू दाण्यापर्यंत पोहोचले की जपमाळ उलटे होते. सुमेरू कधीही पार करू नये. जेव्हा तुम्ही मंत्र जप पूर्ण कराल तेव्हा कपाळावर सुमेरू लावून नमस्कार करावा. यामुळे नामजपाचे पूर्ण फळ मिळते.

# पुरुषसूक्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील नव्वदावे जे सूक्त तेच ‘ पुरुषसूक्त ’ होय. एकंदर सोळा ऋचा यात समाविष्ट आहेत. या सूक्ताचा कर्ता नारायण ऋषी आहे. पुरुषसूक्त हे नाव वेदातील नाही. ब्रह्मकर्मात या ऋचांचा वापर सुरू झाल्यावर याज्ञिकांनी त्यांना ‘ पुरुषसूक्त ’ हे नाव दिले.

हजारो मस्तके, हजारो नेत्र व हजारो पाय असणाऱ्या पुरुषरूप परमात्म्याने हे सारे विश्व व्यापले आहे. शिवाय तो पुरुष दहा बोटे शिल्लक उरला आहे. हे सारे विश्व ईश्वररूप आहे. भूतकाळीजे होते, वर्तमानकाळी जे आहे, भविष्यकाळी जे असेल, ते सर्व पुरुषमय आहे. या पुरुषापासूनच विश्वाची निर्मिती झाली. या आदिपुरुषानेच आपल्यापासून दुसरे देव, मानव इत्यादी उत्पन्न केले. ह्या पुरुषाला हवी कल्पून देवांनी आणि ऋषींनी यज्ञ सुरू केला. या यज्ञापासून पशू-पक्षी आणि नानाविध प्राणी निर्माण झाले.

या विराट पुरुषाच्या मनापासून चंद्र, नेत्रापासून सूर्य, श्वासापासून वायु, नाभीपासून अंतराळ, मस्तकापासून द्युलोक, पायांपासून भूमी व कानांपासून दिशा निघाल्या. हा पुरुष शास्त्रोक्त कर्म करणाऱ्यांना त्यांच्या चित्तशुध्दीद्वारा मोक्ष प्राप्त करून देतो. या पुरुषाचे दुसरे नाव आहे, ‘ परमात्मा. ’ पुरुषसूक्तात हे सर्व आले आहे.

नारायण ऋषीने वर्णिलेला पुरुष हा ईश्वर आहे. ईश्वरासंबंधी नारायण ऋषीने केलेल्या प्रदीर्घ चिंतनाचा आणि त्या महान् तत्त्वज्ञानाचा अविष्कार ‘ पुरुषसूक्ता ’ त झाला आहे. हे सारे विश्व ईश्वरमय असल्याचे नारायण ऋषींना भासले. ईश्वर आणि जगत् एकरूप आहे. ईश्वर अनंत आहे, अपार आहे, असे नारायण ऋषी सांगतात.

यज्ञ हा सर्वांत पहिला धर्म होता, हे नारायण ऋषींच्या या ‘ पुरुषसूक्ता ’द्वारे कळते. कोणकोणत्या गोष्टींची निर्मिती यज्ञापासून या पृथ्वीतलावर झाली, ते नारायण ऋषींनी कथन केले आहे. अद्वैत तत्त्वज्ञान व अद्वैत भक्तिमार्ग यांना प्रेरणा देणारे असे हे आदरणीय, परममंगल सूक्त आहे. ‘ पुरुषसूक्त ’ हे विश्वचालकाचे स्तुतीरूप आहे.

प्राचीन काळी ‘ पुरुषसूक्त ’ उपनयनादी संस्कार झाल्यावर द्विजत्व पावलेल्या युवकांना मुखोद्गत करावे लागत असे.

स्नान केल्यावर ‘ पुरुषसूक्त ’ शांतचित्ताने दररोज पठण करावे. तदनंतर ‘ विष्णूसूक्त ’ म्हणावे. असा प्रघात आहे. भगवान सूर्यनारायणाच्या अपेक्षित वरदानाची प्राप्ती करून घेण्यासाठी ‘ पुरुषसूक्ता ’ तील सहाव्या ऋचेतील (वसन्तो स्यादीदा) मंत्राने यज्ञात तुपाची आहुती द्यावी. याच्या पाठाने महापातकांचा नाश होतो. सर्व पातकांचा नाश होण्यासाठी एक महिना ‘ पुरुषसूक्ता ’चा पाठ करावा.

मौल्यवान वस्तूची प्राप्ती होण्यासाठी श्रावण महिन्यात चांद्रायण व्रत करून शुध्द झालेल्याने ‘ पुरुषसूक्ता ’चा दररोज एक पाठ करावा. याच्या नित्य पठणाने सर्व इच्छा फलद्रूप होतात. इतकेच नव्हे, तर पठणकर्त्याचा भाग्योदयही निश्चितपणे होतो.

षोडशोपचार पूजा ‘ पुरुषसूक्ता’तील १६ ऋचांच्या सहाय्याने केली जाते. एक एक ऋचा ही पूजेतील एक एक उपचार आहे. अभिषेकाचे वेळी ‘ पुरुषसूक्त ’ म्हणण्याचा प्रगाध आहे. तिन्ही वेदात या सूक्ताचा समावेश असून हे हिंदू धर्मियांच्या उज्ज्वल परंपरेचे प्रतीक आहे.

# दानत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गाणगापूर येथील दत्त पादुका मंदिरात दर्शनासाठी गेलो होतो. मंदिरात प्रवेश करणार तोच नेहमी मंदिराच्या कोपऱ्यावर भीक मागणारी एक अंध म्हातारी दिसली. सुरकुतल्या चेहऱ्याने व कृश हाताने ती मंदिराचा दरवाजा चाचपडत होती.
भीक मागत ही म्हातारी आज थेट इथपर्यंत आली. हा विचार करून मी माझा पाऊच तिला भीक देण्यासाठी उघडला. मुद्दामच नोटांच्या कप्प्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून चिल्लरच्या कप्प्याकडे हात घातला. त्यातही हाताशी आलेल्या १० व ५ च्या नाण्याला सोडून सगळ्यात छोटे एक रुपयाचे नाणे काढले आणि स्वतःला दानशूर माणूस समजून देवाच्या अगदी समोरच तिच्या हातावर (ज्यात अगोदरच काही नाणे होते) ते नाणे टेकवले. म्हातारीने त्या नाण्याचा स्पर्श होताच ‘ सुखी राहाचा ’ भरभरून आशीर्वाद दिला. एक रुपयाच्या बदल्यात देवाच्या साक्षीने सकाळी सकाळी ‘ सुखी राहा ’च्या आशीर्वादाने मिळाल्याने मनोमन खूश होत मी दत्त दर्शनासाठी पुढे सरसावलो. बघतो तर ती म्हातारीही पुढे होत होती.
मी म्हटलो दिले की आजीबाई पैसे. अजून काय पाहिजे?
म्हातारी : देवाला भेटायला निघाले बाळा.
मी हसत बोललो : का ग, देवाकडे अजून पैसे मागायचेय का?
म्हातारी : नाही रे. तोच तर रोज देत असतो. तुमच्यासारख्यांच्या हातून.
मी तिच्या उत्तराने थबकलो व माझा पूर्वीचा चेष्टेचा सूर बदलून तिला विचारले, मग काय आजी तुला दर्शन घ्यायचे आहे का?
म्हातारी : हसत-हसत बोलली. मला कुठे काही दिसत रे बाबा की आत जाऊन त्याचे वेगळे दर्शन घ्यावे.

तिच्या या उत्तराने आता मी पुरता भांबावलो, दरवाज्याकडे परत वळलो व काहीतरी बोलायचे म्हणून बोललो. चल आज्जी, तुला हात धरून देवापाशी घेऊन चलतो.
म्हातारी : तू चाललाय ना आत?
मी : हो, का ग.
म्हातारी : मग माझे एक काम करशील पोरा.
मी : (साशंक होत) बोल काय काम?
म्हातारीने तिचा हात पुढे केला आणि बोलली एवढे देवाला देशील?
आणि तिने हाताची मूठ हळुवार उघडली. त्यात १०, ५, २, १ ची नाणी होती.
मी : हे देवाला द्यायचे?
(तिची परिस्थिती बघून मी आश्चर्याने बोललो)
म्हातारी : हो.
मी : देवाला काय करायचे तुझे पैसे?
म्हातारी : अरे तोच तर मला देतो. मग मी नको त्याला काही द्यायला?
मी : अग पण देवाला नाई लागत पैसे. तो काय करेल याचे? उलट हे तुझ्याच कामात येतील की.
म्हातारी : माझ्यापुरते तर तो रोज देतोच की. हे त्याच्यासाठीचे आहेत. त्याच्या पैशाचे काय करायचे, हे त्याचे तो जाणे, तू टाक हे पेटीत जा.
एवढे बोलून ती अंध म्हातारी तिच्या रोजच्या जागेकडे परत निघाली देखील. निष्कामपणे देवाकडे काहीही न मागता देवाची झोळी भरून.
मी म्हातारीच्या खऱ्या औदर्याने भारावलेल्या अवस्थेत न कळत दत्त पादुकांपुढे पुढे उभा ठाकलो. म्हातारीने हातात टेकवलेली सर्व नाणी दानपेटीत रीती केली आणि रीत्या मनाने व रिकाम्या हाताने मंदिराला प्रदक्षिणा मारून संगमाकडे परत निघालो. परतताना पुढे मंदिराच्या कोपऱ्यावर तीच अंध म्हातारी तिच्या नेहमीच्या जागेवर बसलेली दिसली. अगदी प्रसन्न. स्वतःशी हसत, काही तरी बडबडताना.
(ती हातात नुकत्याच कुणीतरी दिलेल्या ५० च्या नोटेला चाचपडत, हसत काहीतरी पुटपुटत होती.) कुतूहलापोटी मी ती काय पुटपुटतेय हे ऐकण्याचा प्रयत्न केला.
म्हातारी : देवा तुला बी जरा दम नाही बाबा, लगेच पैसे परत पाठवले बी, मला काय करायचे रोज एवढे? थोड्या वेळापूर्वी एक रुपयाचे नाणे टेकवणारा व्यवहारी माणूस मी परत एकदा निशब्द झालो, एकदम हरवलेला. कधी त्या म्हातारीकडे बघत होतो, तर कधी दूर गाभाऱ्यात बसलेल्या, न दिसणाऱ्या त्या दत्ताकडे.
कळतच नव्हते कोण मोठे ? रोज न चुकता या दीन-दुबळ्यांची काळजी वाहणारा तो परमपिता परमेश्वर की श्रद्धा व विश्वासाने त्या देवाचीही झोळी भरणारी ती अंध म्हातारी?
देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता देणाऱ्याचे हात घ्यावे.